नि.दि.दावा क्र. ५१/२०२३
संजीवकुमार वि. विरेंद्र
निशाणी क्र. ४२

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ संजीवकुमार यांचा अतिरिक्त पुरावा-
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ हरिणखेडे यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी एम.एस.ई.बी. कडुन प्राप्त झालेले पत्र आणि मी त्या पत्राला दिलेल्या उत्तराची प्रत दाखल केली आहे. सदर कागदपत्रांना नि.क्र. १९९ ते २०० देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा प्रतिवादीतर्फे उलटतपास त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. गुप्ता यांद्वारे -

३. माझी नागपुर येथे पुर्वी साक्ष झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल करतांनी वनजमिनीवर माझा ताबा असल्याचा उल्लेख मी केला नव्हता, तसेच पुर्वीच्या माझ्या साक्षीमध्ये देखिल मी त्याचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सर्वे नं.५५ वर माझा ताबा असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की विरेंद्र बनकर यांच्या ४ आर जमिनीवर माझा ताबा आहे. माझ्या धाब्याचे विज मिटर हे विरेंद्र बनकर याच्या नावाने आहे. हे मला माहित नाही की एखादी व्यक्ती मयत झाल्यानंतर, त्याचे नाव कमी होते. प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याचे मला एप्रिल, २०२५ मध्ये समजले. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र. १ मयत झाल्यानंतर, त्यांचे नाव कमी करावे म्हणुन मी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ चे विजमिटर मी बेकायदेशीर रित्या वापरत आहे. प्रतिवादी क्र.५ ही प्रतिवादी क्र.१ ची सख्खी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.५ मला धमकावत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दाव्यातील कमतरतेची पुर्तता करणेकामी मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास नाही.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI
L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.16 17:44:52 +0530

दिनांक १२.०३.२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)